साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१२६ | पाने-१२ | दि.२६/५/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
शिवम स्टिल अ‍ॅन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
खडी, क्रेशसॅण्ड योग्य दरात मिळेल
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# नगरपालिका इमारत कधी होणार ? - कर्मचारी आणि नागरीकांचे हाल

## पालिकेचा कारभार चालतो कोंडवड्यातून !

करमाळा : सोलापूर जिल्ह्यातील १५६ वर्षाच्या सर्वात जुन्या असलेल्या करमाळा नगरपालिकेला कार्यालय नसल्याने या पालिकेचा कारभार चक्क चालतो कोंडवड्यातून. अपुऱ्या इमारतीत कसेबसे कामकाज चालवले जात आहे. त्याचा त्रास कर्मचारी व नागरीकांनाही होत आहे. शासनाने दिलेल्या मंजुरीनूसार या इमारतीचे काम तातडीने व मजबूत करावे; अशी नागरीकांची मागणी आहे.

करमाळा नगरपालिकेची स्थापना ब्रिटीश कालावधीत १ मे १८६७ साली झाली आहे. सध्या पालिकेचे वय १५६ वर्ष आहे. अशा जुन्या पालिकेला कार्यालयीन इमारतच (पान नं.३ वर..)




शासनाने पालिकेच्या इमारतीसाठी १९ एप्रिल २०२२ रोजी ४ कोटी ५५ हजार रूपये मंजूर केले आहेत. मध्यंतरी सरकार बदलले व या कामास स्थगिती आली होती. पुन्हा नवीन सरकारनेही या खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार आत्तापर्यंत तांत्रिक मंजुरी घेतली आहे. मा.जिल्हाधिकारी साहेबांची प्रशासकीय मान्यता मिळाली की या कामाची निविदा निघेल व काम सुरू होईल. केवळ पालिका इमारतच नाहीतर पालिकेच्या सांस्कृतीक भवनसाठीही शासनाने ५ कोटी ५४ लाख ४५ हजार मंजूर केले आहेत. ते कामही केले जाईल तसेच छत्रपती शिवरायांच्या अश्वरूढ पुतळा परिसर सुशोभीकरणासाठी ४५ लाख रूपये मंजूर झाले आहेत. ही कामे लवकरच पुर्ण होतील.

**... बालाजी लोंढे (मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद)**

प्रवेश... श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित प्रवेश...
SHRI GIRDHARDAS DEVI PRATISHTHAN
ज्ञानम् परम् बलम्
नवभारत इंग्लिश मेडियम स्कूल & ट्विंकलिंग स्टार्स
पुणे रोड व वेताळपेठ, करमाळा. Empowered by Lead, Mob No.7741907285, 9960522370
Nursery, L.K.G., U.K.G. 1st to 10th
वर्गासाठी प्रवेश देणे चालू
प्रशालेची वैशिष्ट्ये...
- पहिली ISO नामांकीत School
- RO Water Machine असणारी School
- शहरातील वायु प्रदुषण, ध्वनी प्रदुषण इ. पासून मुक्त वातावरण
- स्वत:ची प्रशस्त इमारत व Play Ground
- शिशु वर्गासाठी सुसज्ज खेळणीगृह, प्रशस्त क्रिडांगण
- तज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद
- Olympiad, MTS, Scholarship मध्ये International Level वर पोहोचलेला विद्यार्थी वर्ग
- उत्कृष्ट मार्गदर्शन व विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष
- 10th Exam साठी करमाळा Center
- विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज Computer, Science Lab, Library
- प्रशालेमध्ये दररोज आरोग्यवर्धक स्वच्छता
- मुलांसाठी खेळण्यास बगीचा
- प्रत्येक Class मध्ये T.V.(Digital Classes)

खालील QR Code ला Scan करून School पाहू शकता.
Hurry up Admission open



यशस्वी जीवनासाठी सतर्क राहण्याची गरज असते.

संपादकीय.......................................!

# सतर्क..!

प्रत्येक व्यक्तीला स्वत:बद्दल अभिमान वाटतो व तो वाटणे सहाजिकच आहे. पण हा अभिमान वाटण्यासाठी स्वत:वर मेहनत घेतली पाहिजे. आपण कसे जगावे, समाजात आपणाला सन्मान कसा मिळेल; यासाठी योग्य नियोजन केले पाहिजे. एवढेच नव्हेतर प्रत्येक क्षणी सतर्क राहिले पाहिजे. सतर्क म्हणजे सजग, सावध राहिले पाहिजे. जीवनात नेमके काय करायचे.. हे पण एकदा ठरले पाहिजे. जीवनात पैसा कमवणे हे प्रत्येकाचे उद्दीष्ट असते. खरंतर पैसा हे उद्दीष्ट नसते तर ते एक साधन आहे. ज्याप्रकारे आपणाला दिल्लीला जायचे असेलतर आपण विमानाने अथवा रेल्वेने जावू शकतो. विमान-रेल्वे हे उद्दीष्ट नाहीतर ते साधन व दिल्ली हे साध्य आहे. तसेच जीवन जगताना आपले साध्य प्राप्त करण्यासाठी पैशाची गरज लागते एवढेच पैशाचे काम असते. पण आपण फक्त आणि फक्त पैशा हेच उद्दीष्ट ठरवून वाटचाल करत असल्याने जीवनाची दिशा बदलते आणि हाती दशा प्राप्त होते. यामुळे पैशा किती,कसा व कोठे मिळवायचा यासाठी सतर्कता असणे गरजेचे आहे.

खरंतर जीवनाच उद्दीष्ट ठरवताना आपण फक्त स्वत:ला काय मिळेल.. याचा विचार करतो. पण खरं जगणं तेच आहे, की आपण आपलं तर पहावंच पण आपलं पाहून इतरांसाठी काय करता येईल का..? हे जगण्याचे उद्दीष्ट असले पाहिजे. मनुष्य ही प्रजाती अशी आहे, की त्याला हसता येते, बोलता येते, रडता येते. भावना व्यक्त करणारा व भावना जाणणारा फक्त माणूस आहे. त्यामुळे नोकरी, शेती, काम व पैसा यासाठी हा जन्म नाहीतर त्यापेक्षा वेगळ काही मिळवण्यासाठी हा जन्म आहे. विशेष म्हणजे आनंद मिळवण्यासाठी हा जन्म आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात.. 'सुखाचे व्यवहारी सुख लाभ झाला। आनंद कोंडला मागे पुढे।।' म्हणजे जगणं कशासाठी तर आनंदासाठी व आनंद कोठे तर सुखाच्या व्यवहारात आहे. एवढेच नव्हेतर एका अभंगात संत तुकाराम म्हणतात... 'पिकलीया शेंदे कडुपण गेले। तैसे आम्हा केले पांडुरंगे।। काम क्रोध लोभ निमाले ठायीची। आवघी श्रृष्टी आनंदाची झाली।।' जीवनात आनंद मिळवण्याचे माध्यम म्हणजे काम, क्रोध व लोभ याबाबत जर सतर्क राहिलेतर खरंच आनंद मिळतो.

जगात अशी कोणतीच गोष्ट अवघड नसते. एकदा राजाच्या दरबारात एक जादुगार आला व त्यांनी एका मोठ्या गाईला हातात उचलून घेतले. सर्व दरबारातील लोक आश्चर्यचकीत झाले. राजासुध्दा आश्चर्यचकीत झाला. पण राणी म्हणाली 'हे काम अवघड नाही , हे काम मी सुध्दा करू शकेल.' राजा म्हणाला 'हे मोठ्या पैलवानाला शक्य नाही ते तू कशी करणार..?' राणी म्हणाली 'मी हे करू शकते पण मला फक्त सहा महिन्याची मुदत द्या !' राणीला सहा महिन्याची मुदत दिली. सहा महिन्यांनी सर्व दरबारी व मोठ मोठे लोक हजर झाले. त्यावेळी राणी एका गायीसह दरबारात आली व तीने मोठ्या गाईला सहज उचलले. दरबारात टाळ्याचा कडकडाट झाला. राजाने राणीला विचारले हे कसे शक्य केले. त्यावर राणी म्हणाली "जगात कोणतेच काम अशक्य नाही. लहान वासरू असताना मी त्याला उचलून घेतले व दररोज त्याला उचलून घेत होते. त्याचे वजन वाढत होते पण मला ते जमत होते व वासरलाही माझी सवय लागली, त्यामुळे वासराची गाय झालीतरी मी तीला उचलत होते व ती मला प्रतिसाद देत होती."

जगातील सर्वात सुंदर गोष्ट काय आहे..? याचे उत्तर 'जग' असेच आहे. म्हणून जगात राहताना कसं राहयचं हे एकदा समजलं की जग सुंदर भासायला लागते.

नेहमीच्या जगण्याची गोष्ट समजून घ्या. माणसाचं आयुष्य खुप गंमतीशीर आहे. माणसाला जे पाहिजे ते मिळेलच असे नाही, एवढेच नाहीतर तो जे ठरवतो तेही होईल याची खात्री नाही. तो ठरवतो एक आणि घडते वेगळेच म्हणून म्हटले जाते "जी माणसं हवीसी वाटतात ती माणसं भेटत नाहीत ! जी माणसं नकोशी वाटतात, त्यांचा सहवास संपत नाही ! ज्यांच्याकडे जावेसे वाटते, त्यांच्याकडे जायला जमत नाही ! ज्याच्याकडे जावू नये वाटते त्याचा सहवास संपत नाही ! जेव्हा जीवन नकोसे वाटते, तेंव्हा काळ संपत नाही ! जेंव्हा जीवनाचा अर्थ समजतो तेंव्हा काळ संपलेला असतो !" याच पध्दतीने माणसाची धडपड चालू असते.

प्रत्येकजण वेगवेगळया दृष्टीने प्रयत्न करत असतो. काही विचारी माणसं, सामाजीक दृष्टीकोन ठेवून, नवनवे संकल्प ठरवून व वेगळया वाटचालीतून अपल्या जीवनाला यज्ञ समजून त्यात स्वत:ला समर्पण करत असतात आणि आनंद मिळवतात. तर काही आहे या गर्तेतून बाहेर पडत नाही, किंबहुना त्यांना बाहेर पडायचे नसते मग तिथे सुखा ऐवजी दु:खाची वस्ती तयार होते. प्रत्येक दिवस आणि प्रत्येक वर्ष हे येते आणि जातेही. त्यामध्ये जो स्वत:चे वेगळेपण निर्माण करतो, वेगळी वाट चोखाळून वेगळं काही निर्माण करतो, त्याला तो दिवस काहीतरी देवून जातो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीची आलेली वेळ, आलेला दिवस चांगल्याप्रकारे घालवण्याची जबाबदारी ज्याची त्याची असते. त्यानुसार धोरण आखून सतर्क राहून कामकाज करावे लागते. आयुष्य ही पुन्हा पुन्हा मिळणारी गोष्ट नाही. त्यामुळे एकदाच मिळालेले आयुष्य कसे जगायचे हे प्रत्येकाने ठरवले पाहिजे.

समाजात बरेचजण कामापुरते गोड बोलतात, काम झाले की द्वाड होतात त्यांना पुन्हा कधीच मदत मिळत नसते, हे त्यांच्या लक्षात गरज पडल्यावरच येते. त्याचा विचार आपण करू नये. त्यामुळे म्हटले, की 'ज्यांच्यावर उपकार केले त्यांना विसरा पण ज्यांनी उपकार केले त्यांना कधी विसरू नका !' असे असलेतरी हा नियम अनेकजण धुडकावून लावतात. अनेकजण जेंव्हा एखाद्याला मदत करता येणे शक्य असते, त्यावेळी मुद्दाम ताणून धरतात, शक्यतो त्याला मदत होवू नये व त्याचे नुकसान व्हावे असा विचार करतात. त्यामुळे आपल्या हातून जे चांगले काम व्हायचे ते तर होत नाही व समोरच्याकडून जी शब्बासकीची थाप मिळणार असते, ती सुध्दा आपण गमावून बसतो. एक नियम आहे. जर मदत करण्याची संधी आलीतर कधीच गमावू नका. त्यातून दोन कामे होतात. समोरच्याची गरज तर भागतेच पण त्याच्याशी आयुष्याचे ऋणानूबंध निर्माण होतात. काही व्यक्तीला नात्यातले अथवा शेजारचे लोक मदत करतात म्हणून त्या व्यक्तीला सतत मदत घेण्याची सवय लागते पण ही सवय खुप घातकी असते. मदतीचे तत्व असे आहे की , 'गरज असेलतर जरूर मदत घ्या पण जेंव्हा स्वत:चे काम स्वत: करता येणे शक्य असते त्यावेळी ते स्वत:च केले पाहिजे.' म्हणून विंदा करंदीकर म्हणतात.. 'देणाऱ्याने देत जावे.. घेणाऱ्याने घेत रहावे.. घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावेत...' जीवन जगताना खरंतर आपले हात मागण्यापेक्षा देण्यासाठी सरसावले पाहिजे तरच त्या जगण्याला एक समाधान असते. बरेच जण फुकटात काय मिळते का.. याचा विचार करतात. खरं तर जगात फुकट कोणीच कोणाला काही देत नाही. चक्क आई-बाप सुध्दा ! संत तुकाराम महाराज म्हणतात.. 'माय-बाप सांभाळती लोभाकारणे पाळीती। तैसा नव्हे देवराव याचा कृपाळू स्वभाव।।' जगात खरंतर कोणीच कोणाला फुकट काही देत नाही. मग वस्तु असो, ज्ञान असो, मदत असो अथवा प्रेम. प्रत्येक गोष्ट ही विनीमयात असते, एकाच्या बदल्यात दुसरी गोष्ट. त्यामुळे म्हटले आहे 'सावली पाहिजे असेलतर अगोदर झाड लावा व चांगला मित्र पाहिजे असेलतर अगोदर चांगला मित्र व्हा !' त्यानुसार भविष्यात प्रत्येकाने विचारपुर्वक जीवन जगले पाहिजे. विशेषत: हुशारीने वागले पाहिजे. ज्याला चांगली माणसं, चांगली वस्तु व योग्य वेळ ओळखा येते अशीच माणसं आयुष्यात सुखी व समाधानी होतात.

जुने केशवसुत म्हणतात 'जुने जावू द्या मरणा लागी, जाळूनी किंवा पुरूणी टाका, सडत न एका ठाई ठका, सावध ऐका पुढच्या हाका..चला खांद्यास खांदा भिडवूनी चालू.' थोडक्यात माणसाने सतत परिस्थितीनुसार सतर्क झाले पाहिजे, परिस्थितीनुसार आपण बदले पाहिजे अन्यथा आपण कधी भंगारमध्ये जमा होवू हे समजणार सुध्दा नाही. त्यामुळे जीवनाचे उद्दीष्ट योग्य ठरवून सतत सतर्क राहून वाटचाल करावी हीच अपेक्षा..!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे...

# नगरपालिका इमारत कधी होणार ? - कर्मचारी आणि नागरीकांचे हाल

नसल्यामुळे फेब्रुवारी २०१८ पासून किल्ला येथील ज्ञानेश्वर वाचन मंदिराच्या इमारतीतून पालिकेचा कारभार चालतो. हा भाग म्हणजे या पालिकेचा पूर्वीचा कोंडवडा होता. या पालिकेचा कारभार पूर्वी छोट्याशा इमारतीतून चालत होता. सन १९४९ साली तत्कालीन नगराध्यक्ष कै.अण्णासाहेब जगताप यांच्या कारकिर्दीत पालिकेच्या इमारतीचे बांधकाम झाले होते. त्या इमारतीत पालिकेचे कार्यालय, सभागृह, नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष कक्ष असे विभाग होते. तसेच ही इमारत दुमजली होती. (म्हणजे आजही अस्तित्वात आहे.) त्यावेळी पालिकेचे कामकाज तीन विभागात चालत होते. त्यामध्ये बांधकाम, दिवाबत्ती व पाणी पुरवठा आणि स्वच्छता, आरोग्य विभाग याचा समावेश होता. तर फक्त ३० कर्मचारी कार्यरत होते. पुढे पालिकेचा कारभार वाढला व ३० कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास १७८ वर गेली (ठेकेदारासह). कामकाजाचे विभाग वाढले. त्यानुसार पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य, बांधकाम, हिशोब विभाग, घरपट्टी-पाणीपट्टी वसुली, शिक्षण-ग्रंथालय, मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष कार्यालय असे एक ना अनेक कार्यालय आहेत.

पालिकेने यासाठी पुणे रस्त्यावर नवीन इमारत बांधण्याचे ठरवले व त्यानूसार सन १९९२ ला पुर्वीच्या यशवंत उद्यान या जागेतच जयप्रकाश टाऊन हॉलच्या मागे दोन एकर अशा प्रशस्त जागेत नवीन इमारत बांधण्याचे धोरण आखले. सुरुवातीला या कामासाठी १७ लाख २३ हजार २६९ रुपयाची निविदा काढली व ते काम १६ डिसेंबर १९९२ ला तत्कालीन पालिकेचे ठेकेदार कै.आर.आय.परदेशी यांना दिले. पण ते काम १९९६ पर्यंत अवघे सात लाख रुपये खर्चाचे झाले. सन १९९६ साली पालिका निवडणूक झाली. सत्तांतरण झाले व देवी गटाकडून जगताप गटाकडे सत्ता गेली. जगताप गटाने १४ फेब्रुवारी १९९९ ला दुसरी २६ लाख ६६ हजार ३५९ रु किंमतीची निविदा काढली. ते काम नव्या ठेकेदाराकडे गेले पण ते काम सदोष झाले. या नव्या इमारतीचा शुभारंभ २१ ऑगस्ट २००१ रोजी माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या हस्ते झाला. पण पहिल्या वर्षापासूनच या इमारतीला गळती लागली. पुढे पुढे तर प्रचंड गळती लागली व फेब्रुवारी २०१८ पासून ही इमारत पुर्णत: बंद केली व पालिका प्रशासन ज्ञानेश्वर वाचन मंदिरात आले. ते गेल्या पाच वर्षापासून अद्यापही अनंत अडचणीतून सुरु आहे.

# तालुका काँग्रेस आय च्या ब्लॉक अध्यक्ष पदी प्रतापराव जगताप

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका काँग्रेस आय च्या ब्लॉक अध्यक्ष पदी प्रतापराव जगताप यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथील टिळक भवन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय सभागृहामध्ये प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या शुभहस्ते श्री.जगताप यांना प्रदेश निवडणूक अधिकारी पल्लम राजु व सरचिटणीस देवानंद पवार यांच्या स्वाक्षरीने निवडीचे अधिकृत पत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील उपस्थित होते.

गेल्या वर्षभरापूर्वी सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्षांच्या निवडी झाल्या होत्या. परंतू बाकीच्या तीन-चार तालुका अध्यक्षांच्या निवडीवरून पेच निर्माण झाला होता. अखेर या वादावरती पडदा पडला असून सर्व तालुका अध्यक्षांना त्यांच्या अधिकृत



निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष मोहिते-पाटील सह सर्व तालुका अध्यक्ष यांनी माजी गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांची मुंबई येथील निवासस्थानी भेट घेतली.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266 9604762600
**डोळ्याचा दवाखाना**
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा..
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

**ओजस हॉस्पिटल**
OJS HOSPITAL
AllOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
वेळ : सकाळी ८ ते रात्री ८
२४ तास अत्यावश्यक सेवा
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार M.sc. Biotech, Health & Nutritionआहारतज्ञ
**ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी** शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. • संपर्क : मो.9960334005, 9423333950

## सुनील(बापू) सावंत यांच्या नेतृत्वाखाली
# करमाळा नगरपरिषदेवर शहर विकास आघाडीचा हलगी मोर्चा



करमाळा(सं.प्र.) : नागरीकांना मुलभूत सुविधा मिळाव्यात व इतर मागण्यांसाठी करमाळा शहर विकास आघाडीच्या वतीने गटनेते सुनील(बापू) सावंत यांचे नेतृत्वाखाली करमाळा नगरपरिषदेवर हलगी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात करमाळा शहरातील नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोर्चा मधील नागरीकांसमोर बोलताना सुनील सावंत म्हणाले, की नगरपालिकेवर प्रशासक आल्यानंतर करमाळा शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून काही ठिकाणी नळाला गटारीचे पाणी येत आहे. आरोग्य विभागातील साफसफाई करणारे ठेकेदाराचा मनमानी कारभार चालू असून शहरातील गटारी तुडूंब भरलेल्या असून ठिकठिकाणी कचरा पडलेला दिसत आहे. नगरपालिका प्रशासनाचे या अत्यावश्यक सेवेकडे लक्ष नाही. शहरातील गोरगरीब नागरीक अनेक वर्षापासून अतिक्रमण घरात रहात असून त्यांची घरे शासनाच्या नियमानूसार नियमित करण्यात यावी, त्यांना घरकुलाचा लाभ मिळावा. शहरातील विकास कामे ठप्प झाली असून नगरपालिकेचे कनिष्ठ अभियंता आठवड्यातून दोन दिवस कामावर हजर असतात. त्यामुळे शहर विकास कामावर परिणाम होत आहे. पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाईचे कामास सुरूवात झाली पाहिजे. परंतु काही दुर्घटना घडलीतर प्रशासनास जाग येते. मुस्लिम दफनभुमी (नासीरजंग) सुशोभित करण्यासाठी अल्पसंख्याक निधी खर्च केला जात नाही. दलित वस्तीसाठी आलेला निधी दलित वस्तीतच खर्च करावा. अशा अनेक मुलभूत सुविधा मिळाव्यात अन्यथा यापुढे तीव्र आंदोलन करण्यात येईल; असेही इशारा सावंत यांनी दिला.

यावेळी गोवर्धन चवरे-पाटील, विवेक येवले, देवा लोंढे यांची भाषणे झाली. या आंदोलनाचे निवेदन करवसुली अधिकारी बदे यांनी स्विकारले. या आंदोलनास शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय शिंदे, मदारी समाजाचे नेते उमर मदारी यांनी पाठींबा दिला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक कंजीर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

**ओपन प्लॉट विकणे आहे**
करमाळा शहराजवळील बागवानगर मधील सोसायटी गार्डन फेसिंग, १२ फुटी रोडटच बोअरवेलसहीत, गुंतवणूक तसेच राहण्यासाठी उत्तम असा दोन गुंठे ओपन प्लॉट योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
संपर्क : मो.7709460591, 8007752828

# चिखलठाण सोसायटीच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार समारंभ आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते संपन्न झाला. यावेळी चेअरमन विकास गलांडे, हेमंत बारकुंड, संतोष सरडे, सर्जेराव मारकड, रविंद्र पोळ, बाळासाहेन नेमाणे, धोंडिराम आरकिले, राहूल गोळे, मच्छिंद्र सरडे, मुक्ताबाई गव्हाणे, माजी जि.प.उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड व ग्रामस्थ उपस्थित होते.

चिखलठाण सोसायटीचे कामकाज चांगले असून, कर्जवसुली शंभर टक्के असते.

तसेच २५ वर्षापासून या संस्थेवर राजेंद्र बारकुंड यांच्या वर्चस्वाखाली एकहाती सत्ता असून आमदार संजयमामा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कामकाज करणार असल्याचे राजेंद्र बारकुंड यांनी मनोगतातून सांगितले. कृषी उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडी च्या निवडणुकीमध्ये आमदार बबनदादा शिंदे व आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निविर्वाद वर्चस्व राखल्याबद्दल करमाळा तालुका व चिखलठाण ग्रामस्थांच्या वतीने राजेंद्र बारकुंड यांनी आमदार संजयमामा शिंदे यांचा सत्कार केला.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# भिलारवाडी येथील बागल गटाच्या कार्यकर्त्यांचा पाटील गटात प्रवेश



करमाळा(सं.प्र.): सध्या मकाई कारखान्याच्या निवडणुकीचे रणांगण तापले असतानाच भिलारवाडी येथील बागल गटाच्या आजी-माजी कार्यकर्त्यांनी तसेच पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद सदस्या सवितादेवी राजेभोसले यांच्या उपस्थितीत माजी आमदार नारायण पाटील यांच्या गटात प्रवेश केला. या कार्यकर्त्यांमध्ये माजी सरपंच रामचंद्र येडे, अंकुशराव अंबोधरे, भारत गिरंजे, बाबुराव अंबोधरे, राजू उगलमोगले, भीमराव मेरगळ, हरिश्चंद्र अंबोधरे, भारत डोळे, आजिनाथ अंबोधरे, बाबुराव वळेकर, महेंद्र गोडसे यांचा समावेश असून यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पाटील गटात प्रवेश केला आहे. याप्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील, अजित तळेकर, प्रा.अर्जुन सरक, पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर, नारायण पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.संजय चौधरी, विनोद बाबर, संजय फडतरे, गणेश घोरपडे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत

**गुरूकुल पब्लिक स्कुलचे घवघवीत यश !**

इ.८ वी | इ.५ वी



सुजल बापु दौंडे (गुण-२०२) | अथर्व अ. राठोड (गुण-१९२) | संस्कृती ग. जाधव (गुण-१८०) | सोहम अ.थोरात (गुण-१६६) | सृष्टी मंगेश फंड (गुण-१५८) | संचिता समीर माने (गुण-२४४) | शरयु अ. बिरंगळ (गुण-२३८) | शार्दुल कुलकर्णी (गुण-२३६) | स्वरा नितीन गपाट (गुण-२३६) | आदिराज घाडगे (गुण-२३०) | चैतन्य रा. डिसले (गुण-२२०) | ऋतुजा सो.खरात (गुण-२१८)

इ.५ वी



वरद ज. देशमुख (गुण-२१४) | सोनाक्षी गायकवाड (गुण-२१०) | वरूण मस्तुद (गुण-२०६) | संग्राम गौतम रोडे (गुण-१९२) | शार्दुल ग. चिवटे (गुण-१९०) | ईश्वरी वि. शिंदे (गुण-१८२) | गणेश मेरूकर (गुण-१८२) | वैभवी पठारे (गुण-१८२) | करण रे.वळेकर (गुण-१८६) | वैभवी लहू जगताप (गुण-१८०) | सोमेश हांडे (गुण-१६८) | संबोधी दि. लांडगे (गुण-१६८)



अपर्णा वि. काटूळे (गुण-१६२) | नंदिनी खु. गुणवरे (गुण-१६२) | पीहू रो. मुसळे (गुण-१६०) | शौर्य स. तनपुरे (गुण-१६०) | ओम शि. गोयकर (गुण-१५८) | ऋणाक्ष रा. घाडगे (१५२) | राजलक्ष्मी दोशी (गुण-१५२) | स्नेहा वायकर (गुण-१५०) | यश अजित उबाळे (गुण-१३६) | संस्कृती मं. फंड (गुण-१३६) | प्रतिक ग. तळेकर (गुण-१३६) | संस्कृती न. भिसे (गुण-१३६)

इ.५ वी व इ.८ वीचे पात्र सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन !



करण बा. सरडे (गुण-१३६) | सोहम दि. बांगर (गुण-१२६) | संग्राम अ. थोरात (गुण-१२२)

शुभेच्छुक **गुरुकुल पब्लिक स्कुल, करमाळा जि.सोलापूर**

## करमाळा शहरात प्रथमच
# मुला-मुलींसाठी ४ जून रोजी जलतरण स्पर्धा

करमाळा(सं.प्र.) : धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने धर्मवीर संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त करमाळा शहरात प्रथमच मुला-मुलींसाठी ४ जून रोजी जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस अधिक्षक मिठू जगदाळे, महावितरणचे सहाय्यक अभियंता रघुनाथ शिंदे, सुशांत स्विमिंग क्लबचे संजय मोरे, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र मोरे यांचे हस्ते ४ जून रोजी दुपारी तीन वाजता होणार आहे. ही स्पर्धा सुशांत स्विमिंग, राजयोग हॉटेल, करमाळा येथे होणार आहे. पाच ते नऊ वर्षे बाल गटासाठी प्रथम बक्षीस २५०० रूपये, द्वितीय बक्षीस १५०० रूपये, तृतीय बक्षीस १००० रूपये ठेवण्यात आले आहे. दहा ते चौदा वर्षे लहान गटासाठी प्रथम बक्षीस ३००० रूपये, द्वितीय बक्षीस २००० रूपये, तृतीय बक्षीस १००० रूपये ठेवण्यात आले असून पंधरा ते सतरा वर्षे मोठ्या गटासाठी प्रथम बक्षीस ५००० रूपये, द्वितीय बक्षीस ३००० रूपये, तृतीय बक्षीस २००० रूपये ठेवण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश शुल्क ५० रूपये ठेवण्यात आले असून, या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन मनसेचे तालुका अध्यक्ष संजय घोलप यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जयंतीनिमित्त
# हिवरवाडी येथे विविध कार्यक्रम - ३१ मे ला भव्य मिरवणूक

करमाळा(सं.प्र.) : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त हिवरवाडी येथे राजमाता ग्रुपच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ३१ मे रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचे जयंतीनिमित्त हिवरवाडी येथे ३० मे रोजी सकाळी नऊ ते अकरा रक्तदान शिबीर घेण्यात येणार असून सायंकाळी सहा ते आठ भव्य खुल्या डान्स स्पर्धा संपन्न होणार आहेत. या स्पर्धेत प्रथम बक्षीस दहा हजार रूपये, द्वितीय बक्षीस सात हजार रूपये व तृतीय बक्षी पाच हजार रूपये ठेवण्यात आले आहे. ३१ मे रोजी सकाळी सहा ते आठ मुलींसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक भेटवस्तू दिल्या जाणार आहेत. सायंकाळी पाच वाजता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची गावातून सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी या जयंती उत्सवात नागरीकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# धर्मवीर संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व विविध संघटनेच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आर.आर. पाटील, प्रकाश लावंड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ, तालुका अध्यक्ष अमित घोगरे, शहराध्यक्ष वैभव माने, जिल्हा उपाध्यक्ष गणेश सव्वाशे, बळीराजा शेतकरी संघटनेचे आण्णासाहेब सुपनवर, शिवाजी बनकर, मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष प्रा.नागेश माने, अतुल वारे, तालुका सचिव गणेश डोके यांचेसह अनिल कणसे, योगेश गुरव, आदित्य जाधव, संतोष कानगुडे आदीजण उपस्थित होते. यावेळी श्री.पोळ म्हणाले, की धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या धर्मासाठी प्राणाची आहुती दिली. संभाजी महाराज ग्रंथपुराण लेखक होते. त्यांनी ग्रंथ निर्माण केले तसेच त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यांनी लोकाभिमुख राज्यकारभार केला. त्यांचा आदर्श आजच्या तरूण पिढीने घ्यावा; असे आवाहन केले. उपस्थितांचे आभार संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष वैभव माने यांनी मानले.




महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्याप्रमाणे!
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

श्रीरंग पेट्रोलियम, करमाळा
पाहिजेत
कामाकरीता हुशार आणि गरजू मुलांची व मुलींची
DSM या पदाकरीता भरती आहे.
गरजूंनी श्रीरंग पेट्रोलियमचे मॅनेजर यांच्याशी संपर्क साधावा.
संपर्क : मो.9834506584, 9307509575, 9922255189
पत्ता : श्रीरंग पेट्रोलियम, नगर-टेंभूर्णी हायवे, लावंड वस्ती, धनश्री हॉटेल शेजारी, करमाळा., जि.सोलापूर

तीन मजली बंगला विकणे आहे
कमलादेवी रोड, बायपास चौक, करमाळा जवळच असलेला तीन मजली भगव्या कलरचा बंगला विकणे आहे. बंगल्याजवळच गजानन महाराजांचे मंदिर असून हॉस्पिटल, हॉटेल व राहण्यासाठी उपयुक्त असलेला सर्व सुविधायुक्त असा तीन मजली बंगला योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
(प्लॉट नं.२०५/१/१/२८)
संपर्क : मो.9881343482, 8805689011, 8605129030

तोच विश्वास, तीच सेवा
आनंद ड्रायफ्रुटस् & गरम मसाला
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
Anand Dryfruit
• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रदाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट
केक भांडी, चॉकलेट क्रंची, टर्निंग टेबल नोजल रशियन आईस्क्रिमचे सर्व साहित्य तसेच केक व वाढदिवस डेकोरेशन सजावट साहित्य मिळेल !
एकवेळ अवश्य भेट द्या..!



एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186





# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स, पोंधवडी

आयोजित

खास अधिकमासानिमित्त

**तिरूपती बालाजी, गोल्डन टेम्पल दर्शन यात्रा**
(कालावधी : दि.१७/७/२०२३ ते २१/७/२०२३)
तिरूपती बालाजी, गोविंदराज, पद्मावती कपिलेश्वर, हरे कृष्णा हरे राम-गोल्डन टेम्पल वेल्लोर
सहल खर्च ५५५५ रूपये

**ओंकारेश्वर, उज्जैन, महेश्वर, इंदौर दर्शनयात्रा**
कालावधी : दि.२६/७/२०२३ ते ३१/७/२०२३
सहल खर्च ७५०० रूपये

**काशी, अयोध्या, प्रयाग दर्शन यात्रा**
कालावधी : दि.४/८/२०२३ ते १०/८/२०२३
सहल खर्च १०००० रूपये (रेल्वे प्रवास ३एसी)

**कन्याकुमारी, सुचिंद्रम, रामेश्वरम्, मदुराई दर्शन यात्रा**
कालावधी : दि.११/८/२०२३ ते १८/८/२०२३
सहल खर्च ८५०० रूपये

**गुजरात दर्शन यात्रा**
(कालावधी : दि.२२/८/२०२३ ते ३०/८/२०२३)
स्टेचु ऑफ युनिटी, अक्षरधाम, गिरनार, सोरटी सोमनाथ, भालकातीर्थ, पोरबंदर, नागेश्वर महादेव, द्वारकाधाम
सहल खर्च १४००० रूपये

**वैष्णोदेवी दर्शन यात्रा**
(कालावधी : दि.४/९/२०२३ ते १३/९/२०२३)
मथुरा, गोकुळ, वृंदावन, आग्रा, अमृतसर अटारी बॉर्डर, वैष्णोदेवी दर्शन यात्रा
सहल खर्च १२१०० रूपये

**चारधाम दर्शन यात्रा**
कालावधी : दि.३०/९/२०२३ ते १४/१०/२०२३
दि.२५/१०/२०२३ ते ०८/११/२०२३
गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ, हरिद्वार, ऋषिकेश
सहल खर्च २९५०० रूपये

**केरळ दर्शन यात्रा**
(कालावधी : दि.१६/११/२०२३ ते २३/११/२०२३)
कोचीन, मुन्नार, पेरियार, थेक्कडी, मुन्नार
सहल खर्च १८५०० रूपये

**संपूर्ण राजस्थान दर्शन यात्रा**
कालावधी : दि.२९/११/२०२३ ते १०/१२/२०२३
सहल खर्च २३५०० रूपये

**नेपाळ दर्शन यात्रा**
कालावधी : दि.१३/१२/२०२३ ते २४/१२/२०२३
सहल खर्च १८५०० रूपये



रेल्वे प्रवास, बस प्रवास, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्थेसह प्रवास

संपर्क

8888333638, 7218333638, 8888771115, 8188868187






**श्री.वैभव एकनाथ राऊत, श्री.महेश रमेश क्षीरसागर, श्री.सोनु अंकुश जगदाळे**

यांची मुंबई, रायगड पोलीस पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक **जय बजरंग बली टूर्स अँन्ड ट्रॅव्हल्स, पोंधवडी**



# पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर

• २९८ वा जयंती उत्सव २०२३ •

• कार्यक्रम पत्रिका •

मंगळवार दिनांक ३०/०५/२०२३ रोजी सकाळी ९ ते ११

**रक्तदान शिबीर**

मंगळवार दिनांक ३०/०५/२०२३ रोजी सायं. ६ ते ८

**भव्य खुल्या डान्स स्पर्धा**

| ट्रॉफी व प्रथम बक्षीस | ट्रॉफी व द्वितीय बक्षीस | ट्रॉफी व तृतीय बक्षीस |
|---|---|---|
| १0000/- | ७000/- | ५000/- |

बक्षीस सौजन्य : राजमाता ग्रुप हिवरवाडी

बुधवार दिनांक ३१/०५/२०२३ रोजी सकाळी ६ ते ८

**रांगोळी स्पर्धा** (मुलींसाठी) : बक्षीस : आकर्षक भेट वस्तू

बुधवार दिनांक ३१/०५/२०२३ रोजी सायं. ५ ते १०

**भव्य मिरवणूक**

वरील सर्व कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे.

स्थळ : जि.प.शाळा, हिवरवाडी, ता.करमाळा, जि.सोलापूर

| महेश इरकर | विकास पवार | दत्तु पवार |
|---|---|---|
| 7020376151 | 9011217844 | 9665262338 |

**आयोजक : राजमाता ग्रुप, हिवरवाडी**



॥ श्री दत्त कृपा ॥





S.DASI FAMILY PAAN SHOP

# दासी

**मॉडर्न फॅमिली पान शॉप**

**पुन्हा एकदा आपल्या सेवेत**

दि.१५ मे पासून चालू झाले आहे.

भारत पेट्रोल पंपासमोर कमलादेवी रोड, करमाळा.

प्रोप्रा. बालाजी अंबादास यनगंदल

मो.9623629498

DESIGNS BY - DADA PAWAR - 9623234555

घरचा पत्ता : लक्ष्मण टेलर, बालाजीनगर, करमाळा.



सोलापूर जिल्ह्यात प्रथम



चि.स्पर्श मुकेश गरीया

लीड स्कुल, करमाळा येथील विद्यार्थी

# चि.स्पर्श मुकेश गरीया

याचा इ.१० वी (सीबीएससी पॅटर्न) च्या परीक्षेत ९६.०४% गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**



शुभेच्छुक

**मुकेश शोभाचंद गरीया**

जनरल मर्चंट ॲन्ड कमिशन एजंट, करमाळा.

**गरीया परिवार, करमाळा.**

# करमाळ्याच्या शुभांगी पोटे यांनी मारली बाजी जोशी, मंजुळे पाठोपाठ मिळविले आय.ए.एस. परीक्षेत यश



करमाळा : आय.ए.एस. परीक्षेचा आजच निकाल जाहीर झाला असून या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. विशेष म्हणजे करमाळा तालुक्यातील शुभांगी सुदर्शन केकान/ सौ.शुभांगी ओंकार पोटे या युवतीनेही बाजी मारली असून घर, संसार सांभाळत असताना अजित जोशी, बालाजी मंजुळे यांच्या पाठोपाठ आय.ए.एस परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे.

शुभांगी या नुकतेच पोंधवडी शाळेतून सेवानिवृत्त झालेले सुदर्शन केकान या शिक्षकाच्या कन्या आहेत. वंजारवाडी हे त्यांचे मुळ गाव आहे. त्यांचा विवाह २० डिसेंबर २०१५ ला शेलगाव (वांगी) येथील सध्या बारामती येथे राहत असलेल्या ओंकार पोटे यांच्याबरोबर झाला. श्री.पोटे हे स्टेट बँकेत मॅनेजर असून सध्या अहमदनगर येथील मुख्य शाखेत कार्यरत आहेत. शुभांगी यांनी लग्नानंतर सन २०१६ ला बी.डी.एस. ची पदवी मिळवली आहे. त्यानंतर सन २०१६ ते २०२० पर्यंत त्यांनी बारामती येथे दंतचिकित्सक म्हणून स्वत:चा व्यवसाय केला आहे. त्यांना शिवम नावाचा सहा वर्षाचा मुलगाही आहे. शुभांगी केकान यांनी मिळवलेल्या यशाबद्दल करमाळा तालुक्याचे आमदार संजयमामा शिंदे, वंजारी महासंघ सोलापूरचे जिल्हाध्यक्ष सयाजीराजे ओंभासे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेशभाऊ करे-पाटील, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबूराव हिरडे यांनी अभिनंदन केले आहे.

स्वत:चा व्यवसाय व परिवार सांभाळत असताना युपीएससीचे स्वप्नं पाहणे ही गोष्ट अशक्यप्राय आहे. विशेष म्हणजे कोणताही क्लास न लावता स्वत: घरातील काम करत त्यांनी विचारपूर्वक अभ्यास केला आणि पहिल्या प्रयत्नात हे यश मिळवले आहे. पती ओंकार पोटे यांचे त्यांना मार्गदर्शन व पाठबळ मिळाले. तसेच सासू व सासरे यांनीही त्यांना याकामी मदत केली. दुर्दैवाने युपीएससीच्या परीक्षेच्या कालावधीत त्यांच्या सासूबाईंचे निधन झाले. अशाही दु:खद स्थितीत त्यांनी परिस्थितीवर मात करत परीक्षा दिली व त्यात यश मिळवले ही बाब विशेष आहे. कोविडच्या कालावधीत त्यांनी स्वत:चा व्यवसाय थांबवून युपीएससी वरती लक्ष केंद्रित केले व त्या या परीक्षेत ५३० वी रँक मिळवून यश हासिल केले आहे.

डॉ.शुभांगी पोटे(केकान) यांनी युपीएससी परीक्षेत ५३० रँक मिळवून घवघवीत यश संपादन केले. या यशाने करमाळाकरांची मान उंचावली आहे. त्यांच्या या यशाबद्दल व भावी वाटचालीस शुभेच्छा !
..श्री.सयाजीराजे ओंभासे
(जिल्हाध्यक्ष, वंजारी महासंघ सोलापूर)

# करमाळा येथील स्पर्श गरीया सोलापूर जिल्ह्यात प्रथम



करमाळा (सं.प्र.) : येथील लीड स्कुलचा विद्यार्थी व व्यापारी मुकेश गरीया यांचे सुपुत्र स्पर्श मुकेश गरीया याचा दहावीच्या परीक्षेत (सीबीएससी पॅटर्न) ९६.९४ टक्के गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला आहे. दहावीच्या परीक्षेत स्पर्श गरीया यास इंग्रजी - ९६ गुण, हिंदी- ९८ गुण, गणित - ९७ गुण, सायन्स - ९५ गुण, सो.सायन्स - ९६ गुणअसे एकूण ५०० पैकी ४८२ गुण मिळाले आहेत. स्पर्श हा करमाळा येथील लीड स्कुलचा विद्यार्थी आहे. लीड स्कुलच्या सोलापूर जिल्ह्यात मानगाव, अक्कलकोट, कुर्डूवाडी, करमाळा येथे शाखा असून या सर्व शाखामधून ९६.०४ टक्के गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान त्याने मिळवला आहे. स्पर्श याचे अभिनंदन लीड स्कुलचे मुख्याध्यापक अतीष क्षीरसागर तसेच करमाळा व्यापारी असो; यांनी केले आहे.

# महात्मा गांधी ज्युनियर कॉलेजचा बारावी विज्ञान शाखेचा ९९.३९ टक्के निकाल

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरातील महात्मा गांधी ज्युनियर कॉलेजचा बारावी विज्ञान शाखेचा ९९.३९ टक्के निकाल लागला आहे. यामध्ये प्रणाली पोपट मोहोळकर (९१.८३ %), सिमरन आयुब सय्यद (९१.५०%), मयुर प्रविण महिंद्रकर (९१%) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, विश्वस्त शंभुराजे जगताप, प्राचार्य पोपट कापले यांनी केले.

# चव्हाण महाविद्यालयात कला शाखेत समर्थ भालेराव, वाणिज्य मध्ये मित खिलोशिया प्रथम

## विज्ञान शाखेत सोनल प्रकाश बैरागी प्रथम



करमाळा(सं.प्र.) : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा बारावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल जाहीर झाला आहे. कला शाखेत ७३.३१ टक्के, वाणिज्य शाखेत ९५.३४ टक्के व विज्ञान शाखेत ९४.५० टक्के निकाल लागला आहे. कला शाखेमध्ये समर्थ कमलाकर भालेराव (८५.३३%), स्नेहल भारत दुरगुडे (८५%), अमन गुरूदास आरणे (८१.५०%) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. वाणिज्य शाखेत मित संदिप खिलोशिया (९०.८३%), अंकिता हिरामण कदम (८९.३३%), प्रताप संतोष कदम (८८.८३%) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. विज्ञान शाखेत सोनल प्रकाश बैरागी (९२%), शुभम सोमनाथ शिंदे (८२.८३%), साक्षी पोपट कांबळे (७६.१७%) यांचे अनुक्रम प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. वाणिज्य शाखेतील संदिप खिलोशिया व अंकिता कदम या दोन विद्यार्थ्यांना सहकार विषयामध्ये ९७ गुण व अकौंटन्सी विषयामध्ये कुणाल मोहोळकर यास ९९ गुण तसेच प्रताप कदम यास हिंदी विषयात ९७ गुण मिळवून पुणे विभागामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील यांनी केले.

बारावी परीक्षेत तालुक्यातील सात महाविद्यालयांमध्ये चांगली स्पर्धा झालेली दिसून येत आहे. या स्पर्धेत कला शाखेत नेताजी सुभाष ज्यु.कॉलेज केत्तूर यांनी बाजी मारली असून शंभर टक्के निकाल मिळवत कला शाखेत प्रथम आले आहे. त्यापाठोपाठ केम उत्तरेश्वर विद्यालयानेही ९८.२१ टक्के मिळवत कला शाखेत तालुक्यात दुसरा क्रमांक तर म.गांधी ज्यु.कॉलेजने विज्ञान शाखेत ९९.३९ टक्के मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. कॉमर्स मध्ये भारत महाविद्यालयाने जेऊरने बाजी मारली आहे. भारत महाविद्यालयात कला शाखेचा ८४%, वाणिज्य शाखेचा ९८% तर विज्ञान शाखेचा ९२% निकाल लागला आहे.

## ब्लड कॅन्सरने त्रस्त मुलाच्या उपचारासाठी

# क्षीरसागर कुटूंबाचे आर्थिक मदतीचे आवाहन



करमाळा(सं.प्र.) : येथील रहिवाशी नवनाथ विठ्ठल क्षीरसागर यांचे चिरंजीव (वय-१२ वर्षे) हे ब्लड कॅन्सरने त्रस्त असून २० एप्रिल पासून त्याच्यावर दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे येथे उपचार चालू आहेत. सर्व तपासण्या केल्यानंतर डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी नऊ लाख रूपये खर्च येईल; असे सांगितले आहे. क्षीरसागर यांचे कुटूंबाची आर्थिक स्थिती हलाखीची असून मुलावर पुढील उपचार करण्यासाठी ते असमर्थ आहेत. त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. तरी मुलाचे प्राण वाचविण्यासाठी दानशूर व्यक्तींनी तसेच सामाजिक संस्था यांनी आर्थिक मदत करावी; असे आवाहन क्षीरसागर कुटूंबांनी केले आहे. (आर्थिक मदतीसाठी संपर्क मो.८६०५४२०५२४, बँक खाते : बँक ऑफ इंडिया (A/c - 071610110013008, IFSC-BKID000716)फोन पे - ९४२१०६८८०६)

**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

**जमीन विकणे आहे**

सदर माझ्या मालकीची स्वतंत्र पाईप लाईन व सामाईक विहिर असलेली साडेतीन ते पावणेचार एकर बागायत जमीन योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
संपर्क : मो.नं.9552741497

# मकाई निवडणूक- बागल गटाने आर्धी बाजी मारली

## सहा जागा बिनविरोध तर अन्य सात जागा बिनविरोध होण्याच्या मार्गावर

करमाळा :मकाई निवडणूकीत छाननीच्या निकालानंतर बागलगटाने आर्धी बाजी मारल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. चिखलठाण ऊस उत्पादक मतदार संघातील-दोन, सहकार संस्था मतदार संघातील -एक, इतर मागासवर्गीय मतदार संघातील-एक, अनुसुचितजाती जमाती मतदार संघातील-एक, भटक्या विमुक्त मतदार संघातील-एक अशा सहा जागा बागल गटाच्या बिनविरोध झाल्यात जमा असून पारेवाडी , मांगी व वांगी या उस उत्पादक मतदार संघातील सात जागा बिनविरोध होण्याच्या मार्गावर आहेत.

यामध्ये सहकार मतदार संघात बागल गटाचे उमेदवार नवनाथ बागल यांचा एकमेव अर्ज असल्याने ते बिनविरोध विजयी घोषीत करण्याची औपचारीकता राहिलेली आहे. याशिवाय इतर मागासवर्गीय प्रतिनिधी मतदार संघात अनिल अनारसे यांचा एकमेव अर्ज राहिलेला आहे.भटक्या विमुक्त जाती प्रवर्ग मतदार संघात बागल गटाचे प्रतिनिधी बापू चोरमले व राजश्री चोरमले यांचे एकाच परिवारातील अर्ज राहिलेले होते. त्यातील राजश्री चोरमले यांनी अर्ज काढून घेतला आहे. त्यामुळे बापू चोरमले यांचा एकमेव अर्ज राहिलेला आहे. हा मतदार संघही बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याचप्रमाणे अनुसुचित जाती-जमाती मतदार संघातही बागल गटाचे अशीष गायकवाड व सुषमा गायकवाड यांचे एकाच परिवारातील अर्ज राहिलेले होते, त्यातील सुषमा गायकवाड यांनी अर्ज काढलेला आहे. त्यामुळे हा मतदार संघही बिनविरोध झाल्यात जमा आहे.

महिला मतदार संघात दोन जागेसाठी चार अर्ज मंजूर झाले होते. त्यामध्ये कोमल करगळ व अश्वीनी झोळ, शांता झोळ असे बागल गटाचे अर्ज होते. तिथे विरोधी गटाच्या सुनिता गिरंजे यांचा एकमेव अर्ज आहे. यातील शांता झोळ यांचा अर्ज काढला आहे. सध्या दोन जागेसाठी तीन उमेदवार आहेत.

मांगी मतदार संघात दोन जागेसाठी दिनेश भांडवलकर






रोहित भांडवलकर, अमोल यादव,रविंद्र लावंड,हरीश्चंद्र झिंजाडे व सुभाष शिंदे असे अर्ज मंजूर आहेत. त्यापैकी रोहीत भांडवलकर, रविंद्र लावंड,हरीश्चंद्र झिंजाडे यांनी उमेदवारी अर्ज काढले आहेत. त्यामुळे तिथे बागल गटा विरूध्द सध्या एकमेव सुभाष शिंदे यांचा अर्ज आहे.

चिखलठाण ऊस उत्पादक मतदार संघात दोन जागेसाठी तीन अर्ज मंजूर आहेत. त्यामध्ये सतीश निळ व त्यांचे नातेवाईक निर्मला इंगळे व दिनकर सरडे यांचे अर्ज मंजूर होते. यात श्रीमती इंगळे यांनी आपला अर्ज काढून घेतला असल्याने या मतदार संघातील निवडणूक बिनविरोध होणारच आहे.

त्याच प्रमाणे वांगी गटात दोन जागेसाठी पाच अर्ज आहेत. त्यात बागल गटाचे दोन अर्ज पुरक आहेत. त्यामध्ये सचिन पिसाळ व तुकाराम पिसाळ तसेच युवराज रोकडे व मनिषा दौंड यांचे अर्ज आहेत. यातील तुकाराम पिसाळ,मनिषा दोंड यांचे अर्ज काढून घेतले आहेत. येथे फक्त विरोधकाकडून फक्त अमित केकान यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आहे.

पारेवाडी मतदार संघात तीन जागेसाठी सात अर्ज आहेत. विशेष म्हणजे ते सर्वच्या सर्व बागल समर्थकाचे आहेत. त्यामध्ये गणेश चौधरी यांनी उमेदवारी न दिल्याने बागल गटावर नाराज होवून अर्ज भरलेला आहे. उर्वरीत अर्ज बाळासाहेब पांढरे/ नितीन पांढरे, रेवन्नाथ निकत/हनुमंत निकत तसेच संतोष पाटील/स्वाती पाटील यांचे अर्ज आहेत. त्यातील नितीन पांढरे, हनुमंत निकत,व स्वाती पाटील यांनी त्यांचे अर्ज काढून घेतले आहेत. राहिला तो फक्त गणेश चौधरी यांचा. यात बागल गट श्री.चौधरी यांचे समाधान करून हा मतदारसंघ बिनविरोध करू शकतात.

जिथे खरी लढत होवू शकतो तो भिलारवाडी ऊस उत्पादक मतदार संघ आहे. तिथे बागल समर्थकांनी उमेदवारी मिळत नाही म्हटल्यावर चक्क बागल गटाला सोडून माजी आमदार पाटील गटात प्रवेश केला आहे. त्यानुसार येथे बागल गटाकडून विद्यमान संचालक रामभाऊ हाके व अजित झांजुर्णे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचे पुरक अर्ज संतोष झांजुर्णे व मंगल हाके हे आहेत. त्यांनी आपले अर्ज काढून घेतले आहेत. सध्या स्पर्धेत विरोधकांचे आप्पा जाधव, सुनिता गिरंजे व बाबुराव अंबोधरे यांचे अर्ज आहेत.

एकंदरीत सर्व मतदार संघाचा आढावा घेतला असता बागल गटाच्या सहा जागा बिविरोध झाल्यातच जमा असून, अन्य सात जागा सहज बिनविरोध होत आहेत. उर्वरीत ठिकाणी म्हणजे वांगी, मांगी या मतदार संघातही एक-एकच विरोधी उमेदवार या क्षणी आहे. त्यामुळे ते लढणार की नाही.. यावर या मतदार संघाचे भवितव्य अवलंबून आहे. सध्यातरी बागल गटाने या निवडणूकीत कमांड मिळावली आहे. जे अर्ज नामंजूर झाले त्याबाबत अपीलात किती यश मिळेल हे सांगता येत नाही. यश मिळाले तरी काही मतदार संघात बागल गटाने पकड मिळवलेली आहे. सध्याच्या स्थितीत प्रा.झोळ व सौ.राजेभोसले यांच्याकडे नेतृत्व राहिलेले नाही व त्यांच्या नेतृत्वाविना अन्य उमेदवार ही निवडणूक कशी लढवणार ? हा खरा प्रश्न आहे. अशी निवडणूक लढवण्यासाठी किमान तीन वर्षे तयारी करावी लागते. अचानक विरोधासाठी विरोध करून निवडणूक लढवणे तसे अवघडच असते. सध्याचे प्रस्थापित राजकारणी आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार जयवंतराव जगताप हे तटस्थ आहेत तर माजी आमदार नारायण आबा पाटील हे सुध्दा तटस्थ आहेत. पण जर प्रा.झोळ व सौ.राजेभोसले यांचे अपीलात अर्ज मंजूर झाले व विरोधकांचे प्रबळ उमेदवार दिसले तर ते विरोधी गटाला पाठींबा देऊ शकतील की नाही; याची खात्री नाही. एकंदरीत बागल गटाला अनंत अडचणी आल्या असल्यातरी सध्यातरी बागल गटाची सत्ता येण्यात अडचणी नसल्याचे चित्र आहे.

## विठ्ठलराव शिंदे कर्मचारी पतसंस्थेच्या संचालक पदी संजय कापसे



करमाळा(सं.प्र.) : गंगामाईनगर, ता.माढा येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी कर्मचारी पतसंस्थेच्या संचालक पदी पोथरे येथील संजय शंकर कापसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. सहकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांची ही जिल्ह्यातील मोठी संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना गरजेनूसार पतपुरवठा पतपुरवठा केला जातो.

या पतसंस्थेच्या संचालक मंडळाची नुकतीच निवडणूक झाली आहे. सदरची निवडणूक बिनविरोध झाली असून त्यामध्ये श्री.कापसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल पोथरे येथील शनैश्वर दिंडी सोहळा संस्था तसेच करमाळा तालुका ग्रामसुधार समितीच्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले आहे.


मनस्वी आभार !

शुक्रवार, दि.१२ मे या सुवर्णदिनी आमची लक्ष्मी, सर्वांचे लाडके कन्यारत्न चि.सौ.कां.आकांक्षा व चि.कृष्णा यांचा विवाह सोहळा थाटामाटात संपन्न झाला. आमच्या या उत्साहाच्या शुभक्षणी सर्व नातेवाईक, सख्खेसोबती, मित्र-मैत्रिणींचा मेळा, सर्व स्तरातील पत्रकार, विविध राजकीय, धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने आपला बहुमुल्य वेळ आमच्यासाठी देऊन उपस्थित राहिले. नव वर-वधूवर सदिच्छा व शुभेच्छांचा वर्षाव केला. ही आमच्या कुटूंबाकरीता अतिशय अमुल्य गोष्ट ठरली. खरंतर आमच्या काळजाचा तुकडा चि.सौ.कां.आकांक्षाचा हात चि.कृष्णा यांच्या हाती सातजन्मासाठी गुंफला. या आमच्या कोवळ्या तुळशीचं रोपटं दुसऱ्या संपन्न कुळात प्रफुल्लितपणे फुलवणं हे आमचं परमभाग्यच ! पण हा सोनियाचा दिवस आमच्यासाठी अतिशय कसोटीचा ठरत होता. पण आपण सर्वांनी आमच्यासाठी वेळात वेळ काढून सहकार्य, माया, कष्ट, त्याग, आपुलकी, मोलाचा आधार, शुभेच्छांचा जणू वर्षाव केलात आणि आम्ही धन्य झालो. केवळ तुम्हा सर्वांच्या सहकार्यामुळे आम्ही आमच्या लाडकीची सासरी पाठवणी करण्याला उभे राहू शकलो ! आमचे कुटूंब तुमच्या मायेचे कधीच उतराई होऊ शकणार नाही. आम्ही आपणा सर्वांचे सदैव ऋणी आहोत. पुनश्च: एकदा मनस्वी आभार !


आपले नम्र

श्री.अविनाश पांडुरंग जोशी (पत्रकार), श्री.गिरीश पांडुरंग जोशी
श्री.संजय पांडुरंग जोशी व जोशी परिवार
किल्ला विभाग, करमाळा.



श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !




पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.

## जिंती येथील अपघातातील महिलेचे निधन -कार चालकाविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : जिंती येथे २२ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास कारने क्रुझर या जीपला पाठीमागच्या बाजूस जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यातील सिताबाई अभिमान जगताप (वय-६२, रा.सौंदे) यांचे उपचार चालू असताना निधन झाले आहे. अन्य जखमींवरती भिगवण येथील मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. धडक देणाऱ्या कार चालकाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यात शुक्राचार्य बलभिम खंडागळे (रा.गुळसडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्याकडे चारचाकी क्रुझर कंपनीची गाडी असून तिचा नंबर एमएच १३ बी.एन.२५१८ असा आहे. २२ मे २०२३ रोजी बाळनाथ सुखदेव जगताप (रा.सौंदे) यांच्या मुलाच्या विवाहासाठी मांजरी (पुणे) येथे गेलो होतो. लग्नानंतर सायंकाळी साडेपाच वाजता जिंती येथील रामवाडी चौकात आलो असताना पारेवाडीकडून येणाऱ्या मारूती सुझुकी क्र.एमएच १२ एनपी ९७३२ या कारचालकाने वेगात येऊन माझ्या क्रुझरच्या पाठीमागील बाजूस जोराची धडक दिली. त्यावेळी माझी गाडी फिरून जगदंबा चायनीज हॉटेलला धडकून थांबली. या अपघातात माझ्या गाडीतील माझ्यासह करण प्रभाकर जगताप, पुष्पा प्रभाकर जगताप, गोदावरी कांतीलाल जगताप, मधुराणी जगन्नाथ जगताप (सर्व रा.सौंदे) तसेच शुभम लबडे (किरकोळ जखमी, रा.शेटफळ), महादेव सुखदेव जगताप व अश्विनी नागनाथ लबडे हे गंभीर जखमी झाले आहेत. यातील सिताबाई अभिमान जगताप या उपचार चालू असताना मयत झाल्या आहेत. अन्य जखमींवर भिगवण येथे उपचार चालू आहेत. या प्रकरणी पोलीसांनी कार चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर कुंजे हे करत आहेत.

## भावाकडून भावास व भावजयीस कोयत्याने मारहाण

करमाळा(सं.प्र.) : किरकोळ कारणावरून भावाने भाऊ व भावजयीस कोयत्याने मारहाण करून जखमी केले आहे. हा प्रकार देवळाली येथे २२ मे रोजी सायंकाळी पाच वाजता घडला आहे. या प्रकरणी वंदना पप्पू पवार (रा.देवळाली) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २२ मे ला सायंकाळी सहा वाजता मी व माझे पती पप्पू पवार दोघे मिळून घरी असताना दीर समाधान पवार हा शिव्या देत आमच्या अंगावर धावून आला व तुझे घर येथे नाही, तु येथे रहायचे नाही.. असे म्हणून माझ्या पतीच्या डोक्यात कोयत्याने मारहाण केली. मी सोडविण्यास गेले असता, एकनाथ पवार याने मला हाताने मारहाण केली तर मंगल पवार हिने शिवीगाळ करून धमकी दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी तिघांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे हे करत आहेत.

## बांधावरील गवत पेटवल्याने शेजाऱ्याचा ऊस जळून ६५ हजाराचे नुकसान

करमाळा(सं.प्र.) : बांधावरील गवत पेटवून त्याची आग शेजाऱ्याच्या ऊसात गेल्याने ऊस, मोटार, पाईप व केबल जळून ६५ हजार रूपयाचे नुकसान झाले आहे. हा प्रकार वरकुटे येथे २४ मे ला दुपारी बारा वाजता घडला आहे. या प्रकरणी ज्योतीराम मनोहर हंडे (रा.वरकुटे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की दत्तू आबाशा हंडे यांनी त्याच्या शेतातील बांधावरील गवत पेटवले. ती आग आमच्या शेतात आली व त्यात ऊस, मोटार, पाईप व केबल जळून ६५ हजाराचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## सातोली येथील पत्रकारावर सख्ख्या भावाचा नातेवाईकासह हल्ला

करमाळा (सं.प्र.) : सातोली (ता.करमाळा) येथील हरिश्‍चंद्र बबनराव साळुंके हे पत्रकार व शिक्षक आहेत. त्यांचेवर त्यांचा सख्खा भाऊ भालचंद्र साळुंके, पुतण्या दिग्विजय, भावजय विद्या, मेहुणे गणेश अडसुळ, अतुल गायकवाड, दत्ता देवकर आदींनी लोखंडी सळईने व काठीने हल्ला केला आहे. हा प्रकार २० मे ला दुपारी तीन वाजता घडला. याबाबत त्यांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली असून वडिलांच्या नावावरील जमीन वाटून का देत नाही या कारणावरून पूर्वीही त्यांनी मारहाण केली व २० मे दुपारी हल्ला करून जखमी केले आहे.

## तरूणाचा तरूणावर हल्ला - करमाळा येथील घटना

करमाळा(सं.प्र.) : मित्राबरोबर गप्पा मारत असताना सोमनाथ उर्फ काशिनाथ माने येऊन कोयत्याने विजय हंडे याच्यावर हल्ला केला आहे. यात विजय नारायण हंडे (कानाडगल्ली) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २४ मे ला दुपारी साडेतीन वाजता मी माझा मित्र प्रताप जांभळे यांच्याबरोबर गप्पा मारत असताना सोमनाथ उर्फ काशिनाथ माने व सोनु जाधव(मंगळवारपेठ) हे दोघे आले व त्यांनी माझ्यावर कोयत्याने हल्ला करून जखमी केले आहे. या प्रकरणी दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## दारू पिवून भावाने भावास चाकूने मारले

करमाळा : दारू पिऊन भावाने भावास चाकूने मारहाण केल्याची घटना (मलवडी) येथे २० ला सकाळी ८ वाजता घडली आहे. या प्रकरणी परमेश्‍वर भास्कर सुरवसे रा.मलवडी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २० मे ला सकाळी आठ वाजता मी माझ्या घराच्या समोर असताना माझा लहान भाऊ सोमनाथ भास्कर सुरवसे हा दारू पिवून आला व शिव्या देऊन लागला. त्यावेळी अशा शिव्या देऊ नको असे म्हटलो असता त्याने चाकूने माझ्या गालावर मारहाण केली. माझे वडील भास्कर सुरवसे हे सोडविण्यास आले असता त्यांनाही मारहाण केली आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### विहाळ येथे दिवसा चोरी करणाऱ्या चोरास

## तरूणांनी सिनेस्टाईल पाठलाग करून रंगेहाथ पकडले

करमाळा (सं.प्र.) : विहाळ येथे भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून घरातील चोरी करताना चोरास पाहिल्यानंतर चोरास पकडण्याचा प्रयत्न केला, परंतू चोर मोटारसायकलवर पळून गेला. त्यानंतर मोटारसायकलवरच पाठलाग करत सिनेस्टाईलने विहाळच्या तरूणांनी त्यास रंगेहाथ पकडले आहे. चोरास पकडले असलेतरी त्याच्या साथीदारांनी मात्र चोरीतील रोख रूपये पळवून नेले आहेत. या चोरास पोलीसांनी अटक करून न्यायालयात हजर केले असता त्यास पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

विहाळ येथे पोपट रामहरी मारकड यांच्या घराची वास्तुशांती २२ मे ला सकाळी अकरा वाजता असल्याने विकास आजिनाथ मारकड व त्यांचा परिवार या कार्यक्रमाला गेले होते. दरम्यान दुपारी बारा वाजता जनावरांना पाणी पाजण्यासाठी सूरज मारकड हा घरी आला असता त्यास घराचा दरवाजा उघडा दिसला. त्यानंतर तो घरात गेला असता सामान अस्ताव्यस्त दिसले व फ्रिजच्या बाजूला एक अनोळखी इसम लपलेला दिसला. सूरजने त्यास पकडण्याचा प्रयत्न केले असता, तो निसटी मारून पळाला व मोटारसायकलवर निघून गेला. त्यानंतर ही बाब मुलाने सांगितल्यानंतर मी स्वत: तसेच अनिल परबत मारकड तसेच आण्णा काशिनाथ मारकड व पिंटू जालिंदर मारकड आम्ही मोटारसायकलवर त्याचा पाठलाग करत गेलो असता हा चोर राजुरी शिवारात मोटारसायकलवरून घसरून पडला. त्यानंतर आम्ही व राजुरी येथील नागरीकांनी पकडून पोलीसांच्या ताब्यात दिले आहे. यातील संशयिताचे नाव संदीप रोहिदास धोत्रे (वय-१९, रा.कुर्डू, ता.माढा) आहे.

## वीट येथे घरात घुसून १ लाख १७ हजार रूपयाची चोरी

करमाळा(सं.प्र.) : वीट (ता.करमाळा) येथे तिघा अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री घरात घुसून लोखंडी कपाटातील रोख ६५ हजार रूपये व उर्वरित सोन्याचे दागिणे असा एकूण १ लाख १७ हजार रूपयाचा ऐवज २१ मे च्या पहाटे चोरून नेला आहे. या प्रकरणी विलास दशरथ राऊत (रा.वीट) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २० मे ला रात्री आम्ही जेवण करून झोपलो असता, २१ मे ला पहाटे एकच्या सुमारास तिघा अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून कपडातील रोख ६५ हजार रूपये व ५२ हजार रूपये किमंतीचे सोन्याचे दागिणे चोरून नेले आहेत. याबरोबरच वीट येथील धनंजय नाळे, विशाल माळवे, विकास राऊत यांच्या घरीही चोरट्यांनी चोरी केल्याचे समजले आहे. या प्रकरणी पोलीसांनी चोरट्याच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास प्रविण साने हे करत आहेत.


हार्दिक अभिनंदन !



डॉ.शुभांगी ओंकार पोटे-केकान

आपल्या यशाचा आम्हांस सार्थ अभिमान आहे !

करमाळा तालुक्याची कन्या
डॉ.शुभांगी ओंकार पोटे-केकान
यांनी UPSC परीक्षेमधून भारतातून ५३० वी रँक घेऊन घवघवीत यश मिळवल्याबद्दल मन:पूर्वक
हार्दिक अभिनंदन !



शुभेच्छुक
श्री.सयाजीराजे ओंभासे (सर)
जिल्हाध्यक्ष, वंजारी महासंघ सोलापूर

धर्मवीर संभाजीराजे यांच्या १४ मे जयंती निमित्त...२०२३





# जलतरण स्पर्धा

## प्रथमच करमाळा शहरात

मुला-मुलींसाठी



✻ कार्यक्रमाचे उद्घाटक ✻

श्री.मिठु जगदाळे (ए.पी.आय. पोलीस स्टेशन करमाळा)

श्री.रघुनाथ शिंदे (साहयक अभियंता महावितरण करमाळा)

श्री.संजय मोरे (सर) (सुशांत स्विमिंग क्लब)

श्री.राजेंद्र मोरे (जिल्हा उपाध्यक्ष मनसे)

प्रवेश फि ५०/-

| बाल गट ५ ते ९ वर्ष | लहान गट १० ते १४ वर्ष | मोठा गट १५ ते १७ वर्ष |
|---|---|---|
| ✻ बक्षिस ✻ | ✻ बक्षिस ✻ | ✻ बक्षिस ✻ |
| २५००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र | ३०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र | ५०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र |
| श्री.दत्तात्रय रेगुडे (युवा नेते) | श्री.संतोष सापते (सामाजिक कार्यकर्ते) | श्री.भरत (भाऊ) आवताडे (युवा नेते) |
| १५००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र | २०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र | ३०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र |
| श्री.दिपक थोरबोले (उपसरपंच) | श्री.शहाजी ठोसर (ग्रामपंचायत सदस्य) | श्री.अमोल कांबळे (सर) |
| १०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र | १०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र | २०००/- ट्रॉफी / मेडल / प्रमाणपत्र |
| श्री.विकास ढाळे (सामाजिक कार्यकर्ते) | श्री.संतोष गुगळे (इंजिनियर) | श्री.बाबा गोडके (सामाजिक कार्यकर्ते) |

✻ बक्षिस समारंभ प्रमुख उपस्थिती ✻

श्री.ज्ञानदेव गायकवाड (अध्यक्ष अदिनाथ महाराज शि.प्रसारक मंडळ)
श्री.विजयराव चांदगुडे (मा.नगरसेवक)
श्री.नरसिंह (आप्पा)चिवटे (अध्यक्ष स्वातंत्र सैनिक वा.संघटना)
श्री.भगवान (नाना) सावंत (जेष्ठ नागरिक)
श्री.हरिभाऊ (आण्णा) फंड (मा.जि.अध्यक्ष तलाठी संघटना)
श्री.ज्ञानदेव (तात्या) फंड (मा.नगरसेवक)
श्री.निवृत्ती (बापू) घोलप (मा.नगरसेवक)
श्री.रामभाऊ (तात्या) घोलप (मा.संचालक अर्बन बँक)
श्री.रामभाऊ राखुंडे (जेष्ठ नागरिक)
श्री.दत्तात्रय चोपडे (गुरूजी) (जेष्ठ नागरिक)
श्री.बलभिम भुजबळ (गुरूजी) (जेष्ठ नागरिक)
पै.मा.हबिब पठाण (वस्ताद)

SB GRAPHICS Mo.8975743207

✻ विषेश सहकार्य ✻

मा.गणेश करे-पाटील (यशकल्याणी सेवाभावी संस्था करमाळा)
मा.विनय ननवरे (सरपंच वोरगांव)
मा.प्रविण जाधव (नगरसेवक करमाळा)
मा.सचिन गायकवाड (संस्थापक कै.बाबुराव गायकवाड प्रतिष्ठाण)
मा.संतोष जाधव (सामाजिक कार्यकर्ते)
मा.महादेव (आण्णा) फंड (माजी व्हा.चेअरमन करमाळा अर्बन)
मा.जितेश कटारिया (मा.ज.पा.शहर अध्यक्ष व्यापारी)
मा.अशोक गोफणे (तालुका उपाध्यक्ष मनसे)
मा.नानासाहेब मोरे (शहराध्यक्ष मनसे)
मा.फुरकान काझी (सामाजिक कार्यकर्ते)
मा.कैलास काकडे (सामाजिक कार्यकर्ते)
मा.सचिन अडसुळ (सामाजिक कार्यकर्ते)
मा.योगेश काळे (सामाजिक कार्यकर्ते)
मा.जोतिराम लावंड (सामाजिक कार्यकर्ते)
मा.सचिन कणसे (शहर उपाध्यक्ष मनसे)
मा.करण आलाट (शाखा अध्यक्ष मनसे)
मा.नागेश दुधाट (सामाजिक कार्यकर्ते)
मा.वैभव गवळी (सामाजिक कार्यकर्ते)
मा.विशाल गुळवे (सामाजिक कार्यकर्ते)
मा.अमोल जांभळे (सोशल मिडीया मनसे)



मा.संजय (बापु) घोलप (मनसे तालुका अध्यक्ष)

✻ आयोजक ✻

धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठाण
महाराष्ट्र नवनिर्माण सेना, करमाळा

रविवार दि.०४/०६/२०२३ उद्घाटन वेळ: दु.३ वाजता
बक्षिस वितरण समारंभ वेळ : सायं ६ वाजता
✻ स्पर्धेचे ठिकाण : सुशांत स्विमिंग, राजयोग हॉटेल, करमाळा जि.सोलापूर

नावं नोंदणी संपर्क : मा.श्रीराम झाटे (सर) Mo.9579911052 (सुशांत स्विमिंग क्लब प्रशिक्षक)